‘‘मराठवाड्यातील ग्रामीण विकासात ग्रामसभेची भूमिका चिकित्सक अभ्यास’’

2020-2024

मानव्यविद्या शाखे अंतर्गत

पीएच.डी. (राज्यशास्त्र) पदवीसाठी सादर करावयाचा शोधप्रबंधाचा गोषवारा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

:: संशोधक ::

नागमणी विठ्ठलराव हाळे

(एम.ए., बी. एड्. (राज्यशास्त्र)

:: मार्गदर्शक ::

डॉ. बोरोळे आर. ए.

(एम.ए., पीएच. डी.)

राज्यशास्त्र विभाग प्रमुख

कर्मवीर तुळशीराम पवार महाविद्यालय, हडोळती

ता. अहमदपूर जि. लातूर

:: संशोधन केंद्र ::

पिपल्स कॉलेज, नांदेड

ता. जि. नांदेड

‘‘मराठवाड्यातील ग्रामीण विकासात ग्रामसभेची भूमिका चिकित्सक अभ्यास’’
2020 - 2024

प्रस्तावना (Introduction) :

भारत हा खेड्याचा देश आहे. भारताच्या विकासासाठी खेड्याचा विकास होणे गरजेचे आहे. म्हणून जोपर्यंत ग्रामीण समाजाचे मागासलेपण दूर होत नाही तोपर्यंत देशाचे आर्थिक विकासाचे स्वप्न साकार होणे शक्य होते. ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी पंचायतराज व्यवस्थेचा स्विकार करण्यात आला आहे. घटनेच्या 40 व्या कलमात गावच्या सर्वांगीण विकासासाठी ग्रामपंचायती स्थापन कराव्यात असे नमुद केले आहे. ही जबाबदारी घटनेने राज्य सरकारवर टाकलेली आहे. भारतामध्ये केंद्रस्तरावर, राज्यस्तरावर व जिल्हास्तरावर कोठेही लोकांचा प्रत्यक्ष निर्णय प्रक्रियेत सहभाग दिसून येत नाही. पण ग्रामीण भागात ग्रामसभेच्या रुपात तो आढळून येतो. राजकीय सहभाग राजकीय प्रक्रियेची ओळख राजकीय सामाजिकरण यासारख्या राजकीय संकल्पनेची ओळख प्रत्यक्ष सहभागाच्या स्वरुपात दिसून येते. खेड्यांचा विकास झाल्याशिवाय देश विकसित होवू शकत नाही हे भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांनी ओळखले होते. म्हणून पंचायतराज व्यवस्थेला बळकटी देण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. असे प्रयत्न ब्रिटिश शासनाच्या कालावधीपासून सुरु झाले. भारतात प्राचीन काळापासून गावचा कारभार पाहण्यासाठी ग्रामसभा अस्तित्वात होत्या. सन 1957 च्या उठावानंतर भारतातील स्थानिक संस्थानात ब्रिटिशानी आपल्या सोयीसाठी अनेक बदल केले. भारतीय नेत्यांनी सुद्धा स्वातंत्र्य चळवळीत स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विकासासाठी प्रयत्न करावेत म्हणून सतत मागणी केली. स्वातंत्र्यानंतर भारताने आर्थिक नियोजन स्विकारुन केंद्रिय पातळीवर नियोजन आयोग, राज्य पातळीवर नियोजन मंडळ व जिल्हा स्तरावर नियोजन कक्ष अशी रचना केली. विविध विकास योजना आखण्याची व त्याची अंमलबजावणी करण्याचे काम सातत्याने चालू केले.

ग्रामीण भागाचे मागासलेपण दूर करण्यासाठी व ग्रामीण समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी समाज विकास योजना किंवा सामुहिक विकास कार्यक्रम भारत सरकारने 1952 साली सुरु केला. पुढे याला पूरक असा ग्रामीण पुनर्रचनेचा आणखी एक कार्यक्रम राष्ट्रीय विस्तार सेवा या नावाने सुरु केला. त्या दोन्हीही कार्यक्रमाचे उद्दिष्ट्ये ग्रामीण जनतेच्या जीवनात परिवर्तन आणणे हे होते.

ग्रामसभा ही त्या त्या गावातील सर्व मतदारांची सर्वसाधारण सभा असते. 73 व्या घटना दुरुस्तीमुळे ग्रामसभेला महत्वाचे अधिकार मिळाल्यामुळे पंचायतराज अधिक मजबूत झाले आहे. ग्रामसभेला संसदेप्रमाणे गावपातळीवरचे अधिकार मिळाले आहे. गावात विकास कामे सुरु करण्याचा व त्या संबंधीच्या खर्चाला मंजूरी देण्याचा अधिकार ग्रामसभेला मिळाला आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या कारभारात पारदर्शकपणा आला आहे. ग्रामसभेचे ग्रामपंचायतीवर नियंत्रण प्रस्थापित झाले आहे. त्यामुळे ग्रामसभा म्हणजे गावची संसद असे त्याचे स्वरुप आहे.

शहरी भागात एकवटलेली सत्ता एकवटलेले राजकीय नेतृत्व ग्रामीण भागातील शेवटच्या स्तरापर्यंत पोहचविण्याचे कार्य ग्रामसभा प्रत्यक्षरित्या करत आहे. सत्तेत सर्व सामान्यांना प्रत्यक्ष सहभाग मिळत असल्यामुळे आपणही लोकशाही प्रक्रियेचा घटक असल्याची जाणीव त्याच्यामध्येही निर्माण होत आहे. म्हणून आधुनिक काळात संशोधकांनी मराठवाड्यातील ग्रामीण विकासात ग्रामसभेची भूमिका चिकित्सक अभ्यास या विषयावर अभ्यास करण्याचे लक्ष केंद्रित केले आहे.

❖ संशोधन विषयाची निवड :

ग्रामपंचायतमध्ये ग्रामसभेला महत्वाचे स्थान आहे. ग्रामसभेतून ग्रामीण भागातून नेतृत्व विकसित होवू शकते. महाराष्ट्रामध्ये सद्यस्थितीत ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद अशा पंचायतराज व्यवस्थेचा स्वीकार करण्यात आलेला आहे. एकंदरीत या स्थानिक स्वराज्य

संस्थेचा उदय झाला आहे. एकंदरीत याचा उद्देश डोळ्यासमोर ठेवून ग्रामपंचायतला महत्वाचे स्थान आहे. मग त्या ग्रामपंचायतच्या ग्रामसभेच्या माध्यमातून सत्ता शेवटपर्यंत जाते काय? सत्तेत सर्वसामान्यांना सहभाग मिळतो काय? या प्रश्नाचे गांभीर्याने ग्रामीण भागात वास्तव्य करुन राहत असल्यामुळे प्रस्तुत संशोधकाने मराठवाड्यातील ग्रामीण विकासात ग्रामसभेची भूमिका एक चिकित्सक अभ्यास या विषयाची निवड केली आहे.

❖ संशोधन विषयाचे महत्व :

ग्रामीण भागाचा राजकीय, आर्थिक, सामाजिक विकास घडवून आणण्याच्या उद्देशाने 73 वी घटना दुरुस्ती केली गेली. या घटना दुरुस्तीद्वारे कायद्यान्वये सत्ता व अधिकार प्रदान करण्यात आले. लोकसहभागाद्वारे व शासकीय योजनाद्वारे ग्रामीण भागातील जनतेला निर्णय प्रक्रियेत सहभागी करुन घेवून प्रत्यक्ष सत्तेत सहभाग मिळवून देण्याची क्रिया ग्रामसभेच्या माध्यमातून होताना दिसते. ग्रामसभेचा एकंदरीत आढावा घेतला तर त्यामध्ये लोकसहभागाची समस्या दिसून येते. जनतेमध्ये असणारी राजकीय उदासीनता ग्रामीण विकासाला मारक आहे. ग्रामसभेतून होणारे सत्ता विकेंद्रिकरण हे लोकशाही सशक्त करणारे आहे. त्यामुळे संशोधनाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील मतदारांना ग्रामसभेचे महत्व समजावे, ग्रामसभेच्या माध्यमातून आपणाला प्रत्यक्ष सत्तेत सहभागी होता येवून आपले सार्वजनिक व वैयक्तिक समस्या सोडविता येतात. याची जाणिवजागृती या संशोधन विषयाच्या माध्यमातून होईल.

❖ संदर्भ साहित्याचा आढावा :

संशोधनात संबंधित आढाव्यास अतिशय महत्व आहे. संशोधन पूर्व साहित्याचा आढावा ही संशोधनातील अतिशय महत्वाची पायरी मानली जाते. संशोधन समस्या ही पूर्वी झालेल्या संशोधनाचे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या संबंधित असते. त्यामुळे संशोधकाला आपल्या संशोधना

संबंधी उपलब्ध माहिती शोधणे गरजेचे आहे. संशोधन करत असताना पूर्व अध्ययनाचा आढावा घ्यावा लागतो. त्यामुळे मराठवाड्यातील ग्रामीण विकासात ग्रामसभेची भूमिका चिकित्सक अभ्यास करताना पूर्व अभ्यासकांनी व संशोधकानी केलेल्या संशोधनपर ग्रंथाचा व विविध संदर्भग्रंथाचा आढावा घेत असताना डॉ. अजय पाटील यांची 73 वी संविधान दुरुस्ती व महिला नेतृत्व विशेष संदर्भ लातूर जिल्हा शोध प्रबंध स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड 2002 प्रा. कुंभारकर के. जी. यांनी ग्रामीण राजकारणातील ग्रामसभेचे योगदान लातूर जिल्हा ग्रामपंचायतचा अभ्यास 2018 यांनी यामध्ये संशोधन केलेले आहे. याचे अध्ययन यामध्ये करावयाचे आहे. त्रिपाठी उमा, मिश्रा उषा पंचायतराज एवम ग्रामीण विकास ऋचा प्रकाशन, जयपूर, 1994, यादव अनुपमा, यादव एम. एस. लोकतांत्रिक विकेंद्रिकरण और ग्रामीण विकास, चंद्रलोक प्रकाशन, जयपूर, 2001 या व इतर संदर्भग्रंथाचा वापर करणार आहोत. शासनाने बनवलेले ग्रामसभेचे नियम त्या नियमाची अंमलबजावणी योग्य होण्याकरीता व सत्ता शेवटच्या स्तरापर्यंत पोहचवण्यासाठी शासन, जनता व स्वयंसेवी संस्था यांना या संशोधनाचा उपयोग होण्याकरीता या संशोधनामध्ये इतर संशोधनाची पुनरावृत्ती होवू नये म्हणून विषयाच्या मांडणी संबंधी निश्चित अशी दिशा मिळते. याकरीता आपण या संशोधनात आढावा घेणार आहोत.

❖ संशोधन उद्दिष्ट्ये :

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अनुषंगाने पुढील उद्दिष्ट्ये निश्चित करण्यात आलेली आहेत.

1) 73 व्या घटना दुरुस्तीनंतर ग्रामपंचायत विकासाचा आढावा घेणे.

2) ग्रामपंचायत पातळीवरील नेतृत्व विकासांचा शोध घेणे.

3) ग्रामसभेच्या तरतुदी अधिकार व कार्ये यांचा अभ्यास करणे.

4) शासकीय योजनेच्या अंमलबजावणीत ग्रामसभेच्या भूमिकेचा अभ्यास करणे.

5) ग्रामपंचायतच्या राजकीय व प्रशासकीय कार्याचा अभ्यास करणे.

6) ग्रामीण भागातील राजकीय विकासातील योगदान अभ्यासणे.

❖ संशोधनाची गृहितके :

1) ग्रामसभेला संविधानाच्या 73 व्या घटना दुरुस्तीमुळे महत्व प्राप्त झाले.

2) ग्रामसभेमुळे राजकीय, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक स्तरामध्ये महत्वपूर्ण बदल होताना दिसतो.

3) सार्वजनिक एकोपा टिकवण्यासाठी ग्रामसभेचे योगदान दिलेले आहे.

4) ग्रामसभेच्या माध्यमातून विकासासाठी येणाऱ्या निधीचा योग्य वापर होताना दिसतो.

5) ग्रामीण भागाच्या विकासाचे उद्दिष्ट्ये ग्रामपंचायतच्या माध्यमातून साध्य होताना दिसते.

6) जनजागृतीमध्ये ग्रामसभेचे चांगले योगदान दिलेले आहे.

❖ संशोधन पद्धती :

प्रस्तुत संशोधनासाठी खालील प्रकारच्या संशोधन पद्धतीचा अवलंब केला जाईल.

नमुना निवड

संशोधनात नमुना जर प्रातिनिधीक आणि योग्य असेल तर निष्कर्ष देखील सुयोग्य राहतात म्हणून संशोधनाची यशस्वीता व सार्थकतेकरीता प्रातिनिधीक नमुन्याची आवश्यकता असते म्हणून प्रस्तुत संशोधन विषयासाठी प्रातिनिधीक स्वरुपाचे तथ्य संकलन होण्यासाठी संशोधन क्षेत्रातील ग्रामपंचायतची निवड करुन गैरसंभाव्यता नमुना निवड प्रकारातील सहेतूक नमुना निवड पद्धतीची निवड करुन ग्रामपंचायतची निवड केली जाईल व ग्रामसभेचा अभ्यास केला जाईल. मराठवाड्याचे क्षेत्र निवडताना सर्व जिल्ह्यांना प्रतिनिधीत्व मिळेल याची दक्षता घेवून छत्रपती संभाजीनगर, बीड, जालना, हिंगोली, नांदेड, परभणी, लातूर, धाराशिव या

जिल्ह्यातील 200 ग्रामपचंयतची निवड करुन प्रत्येक जिल्ह्यातील 25 ग्रामपंचायतची सहेतूक निवड नमुना पद्धतीद्वारा ही निवड केली जाईल.

तथ्य संकलन :

संशोधनात तथ्ये हे महत्वाचे असतात. तथ्याच्या आधारावरच निष्कर्ष मांडले जातात म्हणून तथ्याचे शास्त्रीय संकलन करणे आवश्यक असते. त्यामुळे प्रस्तुत संशोधन विषयाच्या संशोधनासाठी दोन प्रकारच्या तथ्याचा उपयोग करण्यात आला आहे.

प्राथमिक तथ्याचे स्त्रोत म्हणून मुलाखत अनुसूची या तंत्राचा वापर केला आहे. तसेच मराठवाड्यातील गावांना प्रत्यक्ष भेटून सर्वेक्षण केले आहे. सहभागी निरीक्षण ग्रामसभेला प्रत्यक्षपणे उपस्थित राहून सहभागी निरीक्षण करुन संशोधनकर्त्याने तथ्य संकलन केलेले आहे.

दुय्यम तथ्याचे स्त्रोत म्हणून विविध ग्रंथालयामध्ये उपलब्ध असणारे संदर्भग्रंथ, अप्रकाशित शोधप्रबंध, ज्ञानकोश, वर्तमानपत्र, शासकीय अहवाल, साप्ताहिके, मासिके, संकेतस्थळ, यशदा, शासनाकडून प्रसिद्ध होणारे प्रसिद्ध पत्रके यातून माहिती प्राप्त केली आहे.

❖ **संशोधन क्षेत्र :-**

संशोधन संबंधित तथ्य प्राप्तीसाठी संशोधन क्षेत्र निश्चित करणे आवश्यक असते. त्याशिवाय योग्य तथ्य संकलनास व संशोधनास दिशा मिळणे अशक्य असते. तेंव्हा प्रस्तुत संशोधनाचे शीर्षक त्यामुळे प्रस्तुत संशोधन विषयाची व्याप्ती मराठवाड्यातील ग्रामपंचायत पर्यंत मर्यादीत आहे.

❖ **प्रकरण मांडणी :-**

मराठवाड्यातील ग्रामीण विकासात ग्रामसभेची भूमिका चिकित्सक अभ्यास

अभ्यासासाठी निवडलेल्या शोध प्रबंधातील प्रकरणाचा लेखाजोखा खालीलप्रमाणे आहे-

❖ प्रकरण पहिले : प्रस्तावना

1.1 मराठवाड्याचा इतिहास व भौगोलिक परिस्थिती

1.2 सामाजिक

1.3 राजकीय

1.4 सांस्कृतिक

1.5 आर्थिक

1.6 मराठवाड्यातील ग्रामपंचायती

❖ प्रकरण दुसरे : संशोधन पद्धती

2.1 संशोधनाचा आराखडा

2.2 गृहितके

2.3 अध्ययनाचे उद्दिष्ट्ये

2.4 विषयाचे स्वरुप

2.5 विषयाची मांडणी

2.8 संशोधन साहित्याचा मागोवा

❖ प्रकरण तिसरे : ग्रामसभा कायदेशीर तरतुदी व भूमिका

3.1 ग्रामसभेचा ऐतिहासिक आढावा.

3.2 73 वी घटना दुरुस्ती व ग्रामसभा

3.3 ग्रामसभेची रचना, अधिकार व कार्ये

3.4 ग्रामपंचायत निधीचे मार्ग आणि खर्च

❖ **प्रकरण चौथे : ग्रामपंचायतमध्ये ग्रामसभेची भूमिका**

4.1 ग्रामसभेचे राजकीय कार्ये

4.2 ग्रामसभेचे सामाजिक कार्ये जातीय, धार्मिक सलोखा निर्माण करण्यासाठी

4.3 ग्रामसभेचे आर्थिक कार्य

4.4 ग्रामसभेचे प्रशासकीय कार्ये

4.5 ग्रामसभेचे जनजागृती विषयक सांस्कृतिक कार्ये

प्रकरण पाचवे : ग्रामसभा व सार्वजनिक काम

5.1 ग्रामसभा आणि पाणी व्यवस्थापन रस्ते

5.2 ग्रामसभा आणि घरकूल व शौचालय

5.3 ग्रामसभा आणि पथदिवे स्वच्छता

❖ **प्रकरण सहावे : निष्कर्ष व शिफारशी**

प्रस्तुत प्रकरणात संशोधकाने मराठवाड्यातील नमुना निवडीतील मुलाखतदाराकडून आदर्श प्रश्नावली मार्फत मुलाखत घेवून प्राथमिक माहितीचे संकलन करुन तक्त्या /सारणीद्वारे तथ्याचे विश्लेषण करणे.

प्रस्तुत प्रकरणात गृहीतकाची पडताळणी केली जाणार आहे. निष्कर्ष काढून काही उपाय सुचविले जाणार आहेत.

❖ **संदर्भसूची :**

1) अजय पाटील यांची 73 वी संविधान दुरुस्ती व महिला नेतृत्व विशेष संदर्भ लातूर जिल्हा शोधप्रबंध, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, 2002.
2) अशोक नाईकवाडे : 'महाराष्ट्रातील शासन आणि राजकारण', कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, 2013.
3) गोविंद यमलवाड : स्थानिक स्वराज संस्था, कल्पना प्रकाशन, नांदेड.
4) गिरीवरसिंह राठोड : भारत मे पंचायती राज, पंचशील प्रकाशन, जयपूर, 2004.
5) श्याम दौंडकर : पंचायतराज कारभार आणि योजना, प्रथमावृत्ती 1997, अनुबंध प्रकाशन, पुणे.
6) वि. भी. पाटील : महाराष्ट्रातील पंचायतराज व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था, ए. सागर पब्लिकेशन, पुणे, 2005.
7) त्रिपाठी, उमा, मिश्रा उषा, पंचायतीराज एवम् ग्रामीण विकास, ऋचा प्रकाशन, जयपूर, 1994
8) टी. एन. गायकवाड : महाराष्ट्रातील स्थानिक स्वयंशासन, स्वप्नाली प्रकाशन, अहमदपूर, 2001.
9) पंजाब चव्हाण : स्थानिक स्वराज्य संस्थेतील महिला नेतृत्वाचा अभ्यास, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ शोधप्रबंध, 2006.
10) लिला पाटील : 73 वी घटना दुरुस्ती, हे तर वरदान यशमंथन, त्रैमासिक ऑक्टोबर, डिसेंबर 2003.
11) मुंबई ग्रामपंचायत अधिनियम चौधरी पब्लिकेशन, 2007.
12) S. K. Sing : Role of Panchayati Raj in India, New Delhi, 1992.

संशोधक

नागमणी विठ्ठलराव हाळे
(एम.ए., बी. एड्. (राज्यशास्त्र)

मार्गदर्शक

डॉ. बोरोळे आर. ए.
(एम.ए., पीएच.डी.)
राज्यशास्त्र विभाग
कर्मयोगी तुळशीराम पवार महाविद्यालय, हडोळती
ता. अहमदपूर जि. लातूर

‘‘मराठवाड्यातील ग्रामीण विकासात ग्रामसभेची भूमिका चिकित्सक अभ्यास’’

2020-2024

मानव्यविद्या शाखे अंतर्गत

पीएच.डी. (राज्यशास्त्र) पदवीसाठी सादर करावयाचा शोधप्रबंधाचा गोषवारा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

:: संशोधक ::

नागमणी विठ्ठलराव हाळे

(एम.ए., बी. एड्. (राज्यशास्त्र)

मो. 9503343860

Email id. : nagmanihale22@gmail.com

Cast : Open

राज्यशास्त्र

‘‘मराठवाड्यातील ग्रामीण विकासात ग्रामसभेची भूमिका चिकित्सक अभ्यास’’

:: मार्गदर्शक ::

डॉ. बोरोळे आर. ए.

(एम.ए., पीएच. डी.)

राज्यशास्त्र विभाग प्रमुख

कर्मवीर तुळशीराम पवार महाविद्यालय, हडोळती ता. अहमदपूर जि. लातूर

मो. 9420211093

Email id. : drrajaniborole@gmail.com